जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2021
सकाळ

# मुख्य लेखाधिकारीपदी पाटील यांची नियुक्ती

**कोल्हापूर, ता. १० :** जिल्हा परिषदेतील खातेप्रमुखांच्या बदल्यांचे आदेश येण्यास सुरुवात झाली आहे. नूतन मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून विलास पाटील यांची नियुक्ती झाली. यापूर्वीही श्री. पाटील यांनी प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून काम केले आहे. संजय राजमाने निवृत्त झाल्याने हे पद रिक्त होते. उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम यांचीही सांगली येथे बदली झाली असून, त्यांच्या जागेवर फिरोज मुल्ला यांची नियुक्ती झाली आहे. मात्र, कृषी विकास अधिकारी हे पद चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या निवृत्तीनंतर दोन महिने झाले तरी रिक्तच राहिले आहे.

मागील चार वर्षात उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हण राहूल कदम यांनी यशस्वीपणे जबाबदारी पेलली. अर्थविषय अनेक महत्वाच्या विषयांवर त्यांनी निर्णायक भूमिका घेतली. विशेषतः ठेवी ठेवताना बँकांमध्ये स्पर्धा लावून जिल्हा परिषदेला जादाचे उत्पन्न कसे मिळेल, यासाठी प्रयत्न केले व त्याला यश आले.

सीएसआर निधी गोळा करून स्वच्छतेच्या कामास चालना तर दिलीच पण शिंगणापूर क्रीडा प्रशालेला निधी कमी पडणार नाही, याची खबरदारी घेतली. दोन महिन्यांपासून त्यांच्याकडे प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाची जबाबदारी आली. या काळात त्यांनी जिल्हा परिषदेचा सुधारित अर्थसंकल्प तयार करण्याचे काम केले. आज श्री. कदम यांची सांगली येथे स्थानिक निधी लेखा विभागाकडे सहायक संचालक म्हणून बदली झाली.

11 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची ऑनलाईन परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०२० उन्हाळी परीक्षेला मंगळवारपासून सुरुवात झाली. १३१५ विद्यार्थ्यांपैकी १२९१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. एकूण ४३८ अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी १२ हजार ७४० विद्यार्थी बसणार आहेत. बी. कॉम. आयटी, बी. कॉम. बँक मॅनेजमेंट, बीएस्सी बायोटेक, बीएस्सी एलटी, बीएस्सी शुगर टेक्नॉलॉजी, बीएस्सी ॲनिमेशन, बीएस्सी फॉरेन्सीक सायन्स, बीएस्सी फूड प्रोसेसिंग अन्ड पॅकिंग, बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स, बॅचरल ऑफ इंटीरिअर डिझाईनिंग, बॅचरल ऑफ ड्रेस मेकिंग ॲन्ड फॅशन को-ऑर्डीनेशनची परीक्षा झाली.

11 AUG 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो टेक्नॉलॉजीद्वारे तुम्ही होऊ शकता उद्योजक



■ डॉ. पी. एस. पाटील यांचे मत

■ 'नॅनो टेक्नॉलॉजी : नव्या युगाचे तंत्रज्ञान' विषयावर मार्गदर्शन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नॅनो टेक्नॉलॉजी हे नव्या युगाचे तंत्रज्ञान विकसित होत आहे. त्याला मागील वीस वर्षांपासून वेग आला आहे. त्यामध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत. परदेशात पाहिले तर सध्या यात मोठ्या संधी आहेत. याशिवाय आपल्या देशातदेखील हळूहळू संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांना संशोधनाला संधी असून, नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर करून वेगवेगळी साधने तयार करू शकता, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

संजय घोडावत प्रस्तुत आणि दै. 'पुढारी' आयोजित 'एज्यु-दिशा' या लाइव्ह वेबिनारमध्ये 'नॅनो टेक्नॉलॉजी : नव्या युगाचे तंत्रज्ञान' या विषयावर पाटील बोलत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे आवृत्तीचे निवासी संपादक सुनील माळी यांनी केले.

डॉ. पाटील म्हणाले, उच्च शिक्षणात असलेल्या वाटांची ओळख असणे गरजेचे आहे. नॅनो टेक्नॉलॉजीमध्ये संशोधनासाठी भरपूर संधी आहेत. आपण चांगले शास्त्रज्ञ, उद्योजक होऊ शकता. त्याद्वारे अर्थार्जनाच्या संधी निर्माण होऊ शकतात. नोकरी शोधण्याऐवजी आपण नोकरी देण्याचा विचार केला, तर नॅनो टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून यशस्वी उद्योजक होऊ शकतो. नॅनो टेक्नॉलॉजीच्या वापराबाबत बोलताना डॉ. पाटील म्हणाले, कोरोना आपण बघत आहोत, आपले दैनंदिन व्यवहार बदलले आहेत. नॅनो टेक्नॉलॉजीचा उपयोग करून कोरोनाचा प्रादुर्भाव थांबवता येतो. आपण बाहेर पडल्यानंतर मास्क वापरतो. साधा मास्क धूलीकणांना थांबवेल, मात्र विषाणूला रोखू शकत नाही. त्यानंतर नॅनो टेक्नॉलॉजीच्या मास्कवर संशोधन झाले. शास्त्रज्ञांनी संशोधन केल्यानंतर नॅनो टेक्नॉलॉजीचे मास्क आता बाजारात उपलब्ध आहेत. अशा मास्कमध्ये नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर अतिशय प्रभावी होताना दिसतो.

आपल्याला जर नॅनो टेक्नॉलॉजी माहिती असेल तर आपणही मास्क तयार करू शकतो. नॅनो फायबर मेमरीन टेक्नॉलॉजीचे मास्क उपलब्ध आहेत. नॅनो फिल्टर फेस मास्कही उपलब्ध आहेत. त्यामध्ये पॉल्युमरचा वापर केला जातो, ते फिल्टर म्हणून काम करते. त्याच्यामध्ये विषाणू आणि जीवाणू थांबविण्याची क्षमता आहे. त्यामुळे आपण विषाणूपासून बचाव करू शकतो. तिसरी लाट येण्याची शक्यता आहे. डेल्टाचा विषाणू येत असल्याचे सांगण्यात येते. त्यासाठी असे मास्क वापरणे आवश्यक आहे. आपले जीवनमान सुधारायचे असेल, तर नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर केल्यास विविध साधने विकसित करून अशा विषाणूंना आपण मात देऊ शकतो.

पीपीई किटमध्येही नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर केलेला आहे. त्यामुळे अधिक सुरक्षितता निर्माण झाली आहे. हॅण्ड ग्लोव्हज, रुग्णालयातील विविध उपकरणांवर नॅनो मटेरियलचे आवरण लावल्यास तेथील विषाणूंचा प्रादुर्भाव कमी करू शकतो. हेल्थ केअरच्या अनुषंगाने नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर होताना दिसत आहे.

मोठ्या शहरांमध्ये हवा प्रदूषण वाढले आहे. शुद्ध हवेसाठीदेखील नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात येतो. हवा प्रदूषणामुळे विविध व्याधी होतात. हे सर्व टाळण्यासाठी एअर फिल्टरेशन बाय युजिंग नॅनो टेक्नॉलॉजी प्रभावशाली आहे. टेक्स्टाईल मटेरियलचे व्हॅल्यू ॲडिशन करता येऊ शकते. आपण जे शर्ट वापरतो त्यामध्ये जर नॅनो टेक्नॉलॉजीचा विशिष्ट पद्धतीने वापर केला तर विषाणू, थंडी, पाणी यापासून स्वतःचा बचाव करू शकतो. याशिवाय शर्टमध्ये इलेक्ट्रॉनिक सर्किटदेखील नॅनो टेक्नॉलॉजीमार्फत बसवता येऊ शकते, असे डॉ. पाटील यांनी सांगितले.

ते म्हणाले, शेती व्यवसायातदेखील नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर करता येतो. नॅनो टेक्नॉलॉजीवर आणखी भरपूर संशोधन करणे बाकी आहे. आताच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये रस घेऊन आपल्याला असलेल्या अडचणी शोधून त्यावर नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर करून पर्याय शोधावा.

## पाणी शुद्धीकरणासाठी...

पाण्याचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात आहे. पिण्यायोग्य पाणी हे केवळ तीन टक्के उपलब्ध आहे. त्यातील काही बर्फ स्वरूपात आहे. पाणी शुद्धीकरण करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागाचा विचार केला, तर कमी किमतीत पाणी शुद्धीकरण यंत्र देणे गरजेचे आहे. नॅनो टेक्नॉलॉजीचा वापर करून पाणी शुद्धीकरण करता येते का याचे संशोधन सुरू आहे. त्यामध्ये काही जण यशस्वीही झाले आहेत.

## नॅनो आवरणे या क्षेत्रात ठरत आहेत फायदेशीर...

नॅनो मटेरियलचे आवरण वापरल्याने विविध क्षेत्रात फायदा होत आहे. वैद्यकीय, इलेक्ट्रॉनिक्स, बांधकाम, ॲटोमोबाईल, ऑईल व गॅस आदी क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या साधनांवर नॅनो मटेरियलचे आवरण लावता येते. अशा पद्धतीचे आवरण वापरून त्याच्यावरील बाजूचा गुणधर्म बदलू शकतो. अशा अनेक प्रकारची आवरणे करता येऊ शकतात.

## नॅनो मीटर म्हणजे किती...

एक नॅनो मीटर किती लहान असतो याबाबत सांगताना डॉ. पाटील म्हणाले, धूलीकण हा मायक्रोमीटरमध्ये असतो. दहा मायक्रोमीटरचा एक धूलीकण असतो. या धूलीकणाचे एखाद्या साधनाने दहा हजार भाग केले तर एक नॅनो मीटरचा भाग मिळेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र ऑनलाईन परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र अंतिम वर्ष अंतिम सत्राच्या ४३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा मंगळवारपासून ऑनलाईन पद्धतीने सुरळीत सुरू झाल्या. पहिल्या दिवशी १३१५ पैकी १२९१ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

**पहिल्या दिवशी १२९१ विद्यार्थी; ४३८ अभ्यासक्रमांचा समावेश**

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने परीक्षा सुरळीत पार पडाव्यात यासाठी तयारी केली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे १ लाख २० हजार ७४० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. विद्यार्थ्यांना यापूर्वीच ई-मेल व एसएमएसद्वारे लॉगिन व पासवर्ड पाठविण्यात आला आहे.

सर्व परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहेत. मंगळवारी बी.कॉम. आय.टी., बी.कॉम. बँक मॅनेजमेंट, बी.एस्सी. बायोटेक, बीएस्सी शुगर टेक्नॉलॉजी, बीसीएस, बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग, बीए-मल्टिमीडिया आदी परीक्षा झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.